बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि १९ ऑगस्ट २०२३**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५०२/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०८/२०२३ रोजी १०.४५ वा. एस.टी.स्टॅन्ड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी १६.३२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | तेजस्विनी विद्याधर गायकवाड,वय-५५ वर्षे,रा- २६६,बेगमपेठ पोलीस चौकीच्या मागे व्टिंकल शाळे शेजारी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ३,०००/- रु चे लाल काळया रंगाचा कार्बन कंपनीचा मोबाईल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही एस.टी. स्टॅन्ड सोलापूर येथून मोहोळ येथे जाण्यासाठी थांबली असता फिर्यादीचे पर्सची चैन उघडून पर्स मधून नमुद वर्णनाचा व किंमतीचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समंतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून.तपास- पोह/१२३२/चुंगे- ९५११२९५१४१ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५०२/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०८/२०२३ रोजी १२.२० वा. आपटे दुकानासमोर सराफ कट्टा सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी २०.३६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | वैशाली रावसाहेब वाघमारे,वय-४५ वर्षे,रा- ४९/१०१,हनुमान नगर भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १९,४६०/- रूपये चे त्यात ६ ग्रॅमचे सोन्याचे बोरमाळ रोख रक्कम जुवाकिंअ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी सराफ कट्यामधील डी.डी.कळमनकर पुर्व मंगळवार पेठ सोलापूर यांच्या दुकानात नमुद वर्णनाचे व किंमतीचे बोरमाळ दुरूस्ती करीता टाकली होती ती दुरूस्त न करता परत घेवून पांढऱ्या रंगाच्या पिशवीमध्ये पांढऱ्या रंगाचे पाकिट मध्ये टाकून नमुद ठिकाणचे बाजूला हात गाडयावरती घरगुती साहित्य करीत असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समंतीवाचून पिशवीमध्ये हात घालून सदर पांढऱ्या रंगाचे पाकिट हे मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून.तपास- पोह/१६८५/आरेनवरू- ९१५६१२५१३२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४१६/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १७/०८/२०२३ रोजी २१.३० वा ते दि १८/०८/२०२३ रोजी दरम्यान फिर्यादीचे राहते घरासमोरून सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी २२.०४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सचिन शांतप्पा सोळसे,वय-२७ वर्षे,रा- बनशंकरी शेळगी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २०,०००/- रु चे पांढऱ्या निळया रंगाची पट्टा असलेली होन्डा पॅशन प्रो मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ ए के ७२८६ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करून ठेवले असून पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या समंतीवाचुन वरील वर्णनाची व किंमतीचे मो.सायकल मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून.तपास- पोह/१३७०/शिवशरण- ९०२८६०१००१ |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५४९/२०२३ भादवि २७९,३३७,३३८,सह मोवाकाक १८४/१७७,१३४ (ब) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/०८/२०२३ रोजी १९.४५ वा. कंबर तलाव समोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी ०२.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शुभम अनिल भिसे,वय-२८ वर्षे,रा- २७१५,चिंचनगर निराळे वस्ती मुरारजी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | रजाक मुल्ला,वय-४० वर्षे रा- टाकळी,ता.दक्षिण सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे बस स्टॅन्ड वरून त्यांची रिक्षा क्र एमएच १३ सीटी ५९१७ यात पॅसेजर घेवून सैफुलकडे जात असताना नमुद ठिकाणी आले असता मागून येणारा यातील आरोपीत मजकूर यांने त्याच्या ताब्यातील स्कॉर्पिओ क्र एमएच १३ सी के २३७८ ही बेदरकारपणे,हयगयीने अतिशय वेगाने निष्काळजीपणाने चालवून फिर्यादीचे रिक्षाला मागून जोरात धडक देवून फिर्यादी व पॅसेजर सुमिता जगताप असे दोघांना हाताला ,डोक्याला,गुडघ्याला जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे तसेच फिर्यादीचे गाडीचे नुकसान होण्यास कारणीभूत झाला आहे.म्हणून.तपास- पोह/९८७/कंचे- ८३७८९८०९८७ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४६०/२०२३ भादवि ४१९,४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १७/०८/२०२३ रोजी ११.३५ वा. गाळा नं ४०३,जुना विजापूर नाका झोपडपट्टी नं १ विजापूर रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी ०३.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अयाज मकबुल मुल्ला,वय-३७ वर्षे,रा- ५०३,संजय गांधी नगर झोपडपट्टी नं ०२ विजापूर रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | संदिप वाघमारे,रा- माहित नाही. |
| **फसवणुक र** | | १,३३,०००/- त्यात ३७.६३ ग्रॅमचे सोन्याचे ८नग अंगठी, २९.४८ ग्रॅमचे सोन्याचे तीन लॉकेट. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १७/०८/२०२३ रोजी ११.३५ वा. गाळा नं ४०३,जुना विजापूर नाका झोपडपट्टी नं १ विजापूर रोड सोलापूर येथील निहाल ज्वेलर्स या सोन्याच्या दुकानात एक व्यक्ती त्यांच्या अंगावरी पांढऱ्या रंगाचा शर्ट व जिन्स पॅन्ट परिधान केलेले त्याने त्याचे स्वत:चे ओळख मी कलेक्टर साहेबाचा गाडीचा ड्रायव्हर आहे माझे नाव संदिप वाघमारे असून कलेक्टर साहेब हे मिटींगसाठी आलेल्या लोकांना सोन्याच्या अंगठया व लॉकेट गिफ्ट करणार आहेत असे खोटे सांगून फिर्यादीकडून वरील वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे अंगठया व लॉकेट घेवून जावून फसवणुक केली आहे.म्हणून.तपास- सपोनि देशमुख- **८४४६७८५०५३** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५२/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०१/०८/२०२३ रोजी १५.०० वा ते २१.०० वा चे सुमारास सिव्हील हॉस्पीटल येथील बी ब्लॉक बाजूस असलेल्या पी.जी.कॅन्टीनच्या मागे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०८/२०२३ रोजी ०२.३७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | डॉ अतूल दिलीपराव भगत,वय-२९ वर्षे,रा- ३/२०,समर्थ नगर निशीगंधा हाऊस न्यु पाच्छा पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २०,०००/- रु चे काळया रंगाची सिल्व्हर पट्टा असलेली होन्डा पॅशन प्रो मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ ए जे २५४२ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करून ठेवले असून पार्क केली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या समंतीवाचुन |

| | | |
|---|---|---|
| | | वरील वर्णनाची व किंमतीचे मो.सायकल मुद्दाम लबाडीने चोरून नेले आहे.म्हणून.तपास- पोह/४९७/चव्हाण- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५१/२०२३ भादवि ४२०,४६७,४६८,४७१,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ३१/१२/२००४ ते दि २८/०२/२०२० पर्यत तलाठी कार्यालय जिल्हा परिषद कार्यालयासमोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी २३.२८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सज्जन विनायक कांबळे,वय-४९ वर्षे, व्यवसाय- सिव्हील इंजिनियर,रा- १८९/४५ बुधवार पेठ जय मल्हार चौक सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) ईस्माई ईब्राहिम शेख,रा- १७१,इंदिरा नगर विजापूर रोड सोलापूर, २) अब्बास अ.हमीद शेख, ३) चंद्रकांत सिद्राम कांबळे. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०५/०३/२००२रोजी दस्त क्र ९२७/२००२ प्रमाणे मंजरेवाडी सोलापूर येथील आसरा चौक किल्लेदार मंगल कार्यालय मागे मंत्री चंडक इस्टेट येथील सर्व्हे नं ११/१ब/२अ/२ब/प्लॉट नं११७ हा मंत्री हाऊसिंग ॲण्ड कन्स्ट्रक्यशन लिमिटीडचे अधिकारी किशोर चंडक यांच्याकडून रितसर खरेदी केलेला होता,तद्नंतर सदर मिळकतीची फिर्यादीने आजतागायत कोणास कसल्याही प्रकारची विक्री दिलेली नाही. येणेप्रमाणे सद्यस्थिती असताना सदरचा प्लॉट नं ११७ हा दि ३१/१२/२००४ रोजी दस्त क्र ४७४४/२००४ प्रमाणे फिर्यादीने आरोपी क्र १ यांना विक्री केल्याचे दाखवून त्यानुसार सदर दस्तचे अनोंदणीकृत बनावट कागदपत्रे तयार करून सदर कागदपत्रे खरी असल्याचे भासवून सदर कागदपत्रे सुमारे १६ वर्षानंतर म्हणजेच जानेवारी २०२० रोजी तलाठी कार्यालयात सादर करून त्याप्रमाणे फेर उताऱ्यावर नोंद केली तद्नंतर त्यानुसार ७/१२ उतारा व इंडेक्समध्ये नोंद घेवून सदर मिळकत स्वत:ची असल्याचे भासवून नमुद मिळकत ही झहीर नबीलाल मुल्ला यांना रजिस्टर खरेदीखताव्दारे विक्री केली व तद्नंतर झहीर मुल्ला यांनी सदर मिळकत महमद युसुफ याकुबअली उस्ताद यांना रजिस्टर खताव्दारे विक्री करून फिर्यादीची व शासनाची फसवणुक करून नमुद मिळकतीचा अनाधिकृत व बेकायदेशीरपणे व्यवहार केला असल्याने आरोपी क्र १ व त्यांने तयार केलेला दि ३१/१२/२००४ रोजी दस्त नं ४७४४/२००४ या बनावट दस्तातील साक्षीदार नामे आरोपी क्र २ व ३ यांचे विरूध्द कायदेशीर फिर्यादी आहे.म्हणून.तपास- वपोनि क्षीरसागर- **९३०९१२९०८६** |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५५०/२०२३ भादवि लोकप्रतिनिधी अधि १९५१ चे कलम १३४ व लोकप्रतिनिधीत्व अधि १९५० चे कलम ३२ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २१/०७/२०२३ ते दि १७/०८/२०२३ रोजी पर्यत जुने नेत्र चिकीत्सालय कुंकुबाई हॉस्पिटल सोलापूर येथील उत्तर तहसिलदार कार्यालय सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १८/०८/२०२३ रोजी २१.२७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुधाकर तुकाराम बंडगर,वय-४९ वर्षे,व्यवसाय- निवडणुक नायब तहसिलदार,रा- ७६,मंत्री चंडक रेसिडेन्सी विजापूर रोड ,पापाराम नगर जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.श्री किरण गंगाधर जोशी,सहशिक्षक सेवासदन प्रशाला,२) श्रीमती खजुरकर प्रमोदिनी,सहशिक्षीका सेवासदन प्रशाला, ३) श्री पटणे.बी.सी.क.क्षे.लिपीक म.न.पा. झोन क्र ०४, ४) श्रीमती गुजरे अर्चना,सहशिक्षीका न.मु.वि.शाळा रेल्वे लाईन,५) श्रीमती.हंचाटे,एस.ए,सहशिक्षक.त्र्यंबकेश्वर.विदयालय, ६) श्री अंकुश.आर.एस.क.श्रेणी लिपीक झोन क्रमांक ७ म.न.पा.सोलापूर, ७) श्रीमती गायकवाङ.बी.टी.बालवाडी शिक्षीका म.न.पा सोलापूर ८) श्रीमती चौधरी,एस,आर. बालवाडी शिक्षीका म.न.पा सोलापूर, ९) श्रीमती कांबळे.जे.एम. अंगणवाडी शिक्षीका विजय क्लिनीक जवळ सोलापूर, १०) श्रीमती बिराजदार.एस.एन.सहशिक्षका श्री सरस्वती तिमप्पा प्रशाला |

| | | |
|---|---|---|
| | | सोलापूर ११) श्री शिंदे.एस.डी. कनिष्ठ श्रे.लिपीक मनपा मंडया विभाग,१२) श्रीमती मनियार.एस.जे.कनिष्ठ श्रे.लिपीक मनपा आरोग्य विभाग,१३)श्रीमती म्हमाणे.आर.एम.सहशिक्षीका सोनामामा आदर्श कन्या विदयालय मोदी सोलापूर १४) श्रीमती आरगडे.ए.के सहशिक्षीका सिध्देश्वर प्रशाला,१५) श्री संदीप पाटील सहशिक्षक संभाजीराव शिंदे प्रशाला विडीघरकुल सोलापूर,१६) श्री.टी.एम.पवार.सहशिक्षक शहा कोठारी प्रशाला पारसी विहीर सोलापूर १७) सौ शारदा दिगंबर मस्के,मुख्याध्यापक.त्र्यंबकेश्वर विदयालय १८) श्री युवराज शिवाजी मेठे,मुख्याध्यापक कुचन प्रशाला रविवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, भारत निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दि २१/०७/२०२३ ते दि २१/०८/२०२३ या दुसऱ्या टप्प्याचे कामकाज चालू आहे ज्यामध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी घरोघरी भेट देवून मतदारांची पडताळणी करून १८ वर्षे पुर्ण झालेल्या मतदारांची नोंदणी करून घेणे तसेच दि ०१/०१/२०२४ रोजी पात्र ठरणाऱ्या मतदरांचे फॉर्म भरूण घेणे मयत मतदार,कायमस्वरूपी स्थलांतरीत मतदार,दुबार मतदार यांचे नावे वगळणे व मतदार यादीतील नोंदीत दुरूस्ती अशा प्रकारचे काम हे निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार विशेष पुनरीक्षण कार्यक्रमामध्ये करणेबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत.निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार विशेष पुनरीक्षण कार्यक्रमामध्ये करणेबाबतच्या सुचना प्राप्त झालेल्या आहेत.निवडणुक आयोगाच्या सुचनेनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी(BLO) म्हणून शासकीय/निमशासकीय कर्मचारी यांची नियुक्ती केली जाते, त्याप्रमाणे खालील शासकीय/निमशासकीय कर्मचारी यांची नियुक्ती केलेली असून त्यांनी त्यांचे निवडणुकीचे कामामध्ये कसुरी केलेली असल्याने मा.सहा.मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार उत्तर सोलापूर यांनी त्यांचे विरूध्द निवडणुकीचे कामात केलेल्या कसूरीस अनुसरून लोकप्रतिनिधीत्व अधि १९५१ चे कलम १३४ व लोकप्रतिनिधीत्व अधि १९५० चे कलम ३२ नुसार गुन्हे दाखल करणे प्रस्तावित करून कार्यालयाचे आदेश क्र.जाक्र निवडणुक/कावि/४००/२०२३ दि १८/०८/२०२३ अन्वये फिर्यादीस प्राधिकृत केलेले आहे.म्हणून.तपास- पोसई डोंगरे- **८६६८६७०३३४** |